आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५ ऑगस्ट २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- युपीआय प्रणालीची सुरुवात हा भारताच्या डिजिटल पेमेंट इतिहासातला सर्वात मोठा निर्णायक क्षण असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता वाढावी यासाठी केंद्र सरकारनं शुल्कमुक्त तत्वावर आयात केलेल्या साखरेची विक्री करण्याच्या कालावधीत केला बदल

- बाजारातली कृत्रिम तेजी ओसरू लागल्यानं राज्यात साखरेचे भाव नियंत्रणात

- राज्याच्या लोकायुक्त संस्थेच्या अध्यक्षपदी निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी घेतली शपथ

**आणि**

- राज्यात आदिवासी वसतीगृहातल्या प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट रद्द

**<><><><><>**

युनिफाइड पेमेंट इंटरफेस अर्थात युपीआय प्रणालीला १० वर्षे पूर्ण झाली आहेत. २०१६ मध्ये या डिजिटल पेमेंट प्रणालीचा प्रारंभ झाला होता. तेव्हापासून आजपर्यंतच्या वाटचालीत युपीआय हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे. या प्रणालीमुळे महिला, छोटे व्यापारी, विद्यार्थी आणि नवउद्योजकांना आर्थिक व्यवहार अधिक सुलभतेनं तसंच, सुरक्षित स्वरुपात आणि तत्काळ करणं शक्य झालं आहे.

युपीआय या डिजिटल क्रांतींचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला हवा असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. युपीआयला १० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर संदेश सामायिक केला आहे. युपीआय प्रणालीची सुरुवात हा भारताच्या डिजिटल पेमेंट इतिहासातला सर्वात मोठा निर्णायक क्षण ठरला, असं त्यांनी या संदेशात म्हटलं आहे. देशवासियांनी युपीआयबद्दलचे आपले अनुभव सामायिक करावेत असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील युपीआयला दहा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं शुल्कमुक्त तत्वावर आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून तिची विक्री करण्याच्या कालावधीत बदल केला आहे. यानुसार आता आयातदारांना बिल ऑफ एंट्री दाखल केल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत कच्च्या साखरेचं रिफाइंड साखरेत रूपांतर करून ती देशांतर्गत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करावी लागेल. आगामी सणासुदीच्या काळात देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता वाढावी आणि किमतींवरचा ताण कमी करता यावा यासाठीच्या प्रयत्नांचा भाग म्हणून सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

परकीय व्यापार महासंचालनालयानं ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला टॅरिफ रेट कोटा योजनेअंतर्गत १० लाख टन कच्च्या साखरेच्या आयतीला परवानगी दिली होती. या आयात केलेल्या कच्या साखरेवर प्रक्रिया करून, ती ३१ ऑक्टोबरपर्यंत देशांतर्गत बाजारात विकण्याची कालमर्यादा निश्चित केली गेली होती. मात्र देशांतर्गत बाजारात साखरेच्या दरात झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर, आता ही कालमर्यादा बिल ऑफ एंट्री दाखल केल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त दोन महिन्यांची केली गेली आहे. इतर कोणत्याही अटी आणि शर्तींमध्ये बदल केला नसल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

राज्यात साखरेच्या दरात गेल्या तीन दिवसांत प्रतिक्विंटल पंधराशे रुपयांची मोठी घसरण झाली आहे. केंद्र सरकारनं साठेबाजी रोखण्यासाठी उचललेल्या कडक पावलांमुळे बाजारातली कृत्रिम तेजी ओसरू लागल्यानं साखरेचे भाव नियंत्रणात येत असल्याचं दिसून येत आहे. साखरेच्या दरात झालेली वाढ कृत्रिम होती, अशी माहिती राष्ट्रीय सहकारी कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी दिली. घाऊक बाजारात ६७ रुपयांवर गेलेले दर खाली आले असून, किरकोळ बाजारातही प्रति किलो मागे सात रुपयांची घसरण झाली आहे. राज्यात साखरेचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती साखर संचालक डॉ. केदारी जाधव यांनी दिली.

<><><><><>

दरम्यान, जळगाव महानगरपालिकेसमोर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने काल साखरेच्या दरवाढीविरोधात आंदोलन केलं. या आंदोलनात रस्त्यामध्ये चूल पेटवून विना साखरेचा चहा तयार करून महायुती सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला.

<><><><>

निवृत्त न्यायमूर्ती सुनील बाळकृष्ण शुक्रे यांना आज राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी राज्याच्या लोकायुक्त संस्थेचे अध्यक्ष म्हणून शपथ दिली. मुंबईतल्या लोकभवनात हा शपथविधी सोहळा पार पडला. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

शुक्रे यांची नियुक्ती २०२३ च्या नव्या महाराष्ट्र लोकायुक्त कायद्यानुसार केली गेली आहे. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी हा पाच वर्षांसाठी किंवा ते वयाची ७० वर्षे पूर्ण करेपर्यंत, यापैकी जे अगोदर असेल, त्या दिवसापर्यंत असणार आहे.

न्यायमूर्ती शुक्रे यांनी पुणे विद्यापीठातून आपलं पदवीपर्यंतचं शिक्षण आणि त्यानंतर अमरावती इथल्या डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयातून एलएलबीचं शिक्षण पूर्ण केलं होतं. नागपूर विद्यापीठातून त्यांनी घटनात्मक कायदा या विषयात विधी शिक्षणाची पदव्यूत्तर पदवी प्राप्त केली होती.

<><><><>

मुंबई आणि उपनगरातल्या इतर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग, भटक्या विमुक्त जाती आणि जमाती प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांना scholarship.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ ऑगस्ट असून अर्ज पडताळणी १५ सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर जिल्हा, राज्य आणि मंत्रालयीन स्तरावर पडताळणीची प्रक्रिया ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

<><><><>

आदिवासी विभागाच्या वसतिगृहांमधल्या प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट रद्द करत असल्याची घोषणा राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी केली आहे. उईके यांनी आज राज्यभरातले आदिवासी समाजातले आमदार आणि खासदारांसोबत बैठक घेतली. या बैठकीनंतर बातमीदारांशी बोलतांना उईके यांनी या निर्णयाची माहिती दिली. राज्य शासनाच्या याआधीच्या निर्णयानुसार वसतिगृहातील प्रवेशासाठी ३० वर्षे वयाच्या मर्यादेची अट होती. आता ही अट रद्द करण्याचा निर्णय या बैठकीत घेतला असल्याचं त्यांनी सांगितलं.

ही अट रद्द करण्याच्या मागणीसाठी पुण्यात आदिवासी समजाच्या विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु होतं. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्याचं आवाहन केलं होतं.

<><><><>

पालघर जिल्ह्यातल्या मासवण इथल्या अनुदानित आश्रमशाळेत सात वर्षाच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याच्या घटनेत हलगर्जीपणा दाखवल्याबद्दल प्रशासनानं संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. यासोबतच संस्थाचालक, मुख्याध्यापक आणि वर्गशिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या घटनेच्या चौकशीसाठी विशेष समितीचीही नियुक्ती केली गेली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती प्रकल्प अधिकारी विशाल खत्री यांनी दिली.

मृत विद्यार्थी पहिल्या इयत्तेत शिकत होता. ताप आल्यानं २४ ऑगस्ट रोजी त्याचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. सध्या मासवण प्राथमिक आरोग्य केंद्रात १४ मुले आणि १६ मुली अशा एकूण ३० विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. यातील पाच विद्यार्थ्यांना मनोर इथल्या ग्रामीण रुग्णालयात हलवलं आहे. सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचं प्रशासनानं कळवलं आहे.

या घटनेनंतर खत्री यांनी पाहणी केली. खबरदारीचा उपाय म्हणून अन्न आणि औषध प्रशासन विभागाने शाळेतील जेवणासाठी वापरले जाणारे मसाले, तेल आणि इतर साहित्याचे नमुनेही तपासणीसाठी ताब्यात घेतले आहेत. तसंच शाळेत वॉटर फिल्टरही बसवले आहे.

<><><><>

धुळ्यात आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी बिरसा मुंडा क्रांती दलानं आज आंदोलन केलं. नाशिकमध्ये सुरु असलेल्या आदिवासी विद्यार्थी आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी हे आंदोलन करण्यात आलं. महाराष्ट्र सरकारच्या आदिवासी विकास विभागामार्फत शासकीय वसतिगृहांसाठी जारी करण्यात आलेल्या नवीन नियमावलीतल्या वादग्रस्त तरतुदी तात्काळ रद्द कराव्यात, ही मागणी या आंदोलनात करण्यात आली. तसंच आश्रमशाळा आणि वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचे प्रश्न, अपुऱ्या सुविधा आदी मागण्या या आंदोलनात करण्यात आल्या.

<><><><>

बुलढाण्यामध्ये वर्ल्ड फॉर नेचर या संस्थेकडून सीड्स बॉल बॉम्बार्डिंग प्रोजेक्ट राबवला जात आहे. यामध्ये गोफणीच्या साहाय्याने पारंपारिक पद्धतीने हजारो मातीच्या बीजगोळ्यांची पेरणी केली जात आहे. ज्या ठिकाणी वृक्षारोपण करणं खूप अवघड आहे अशा ठिकाणी गोफणीच्या साहाय्याने हे मातीचे गोळे दूरपर्यंत फेकले जात आहेत. या बीजगोळ्यांमध्ये कडुनिंब, आवळा, कदंब, जांभूळ, बहावा, बांबू, रिठा यांसारख्या विविध देशी आणि औषधी वनस्पतींच्या बियांचा समावेश आहे.

<><><><>

अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या पाच उपहारगृहांचे परवाने राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासन विभाग एफडीएने निलंबित केले आहेत. या विरोधात मुंबई क्रिकेट असोसिएशनने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. आज या प्रकरणाची सुनावणी प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती रविंद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर झाली. यावेळी न्यायालयाने मुंबई क्रिकेट असोसिएशनला एफडीएच्या अधिकाऱ्यांकडून येत्या गुरूवारी होणाऱ्या तपासणीपूर्वी उपाहारगृहाचा परिसर स्वच्छ करण्याचे निर्देश दिले.

<><><><>

भारत आणि श्रीलंका यांच्यात कोलंबो इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, श्रीलंकेसमोर फॉलोऑनचा धोका कायम आहे.

श्रीलंकेनं आज आपला पहिला डाव कालच्या २ बाद ८ या धावसंख्येवरून पुढे सुरु केला. मात्र प्रसिद्ध कृष्णा यानं सलामीवीर कमील याला लवकर माघारी धाडत श्रीलंकेला तिसरा धक्का दिला. त्यानंतर आलेल्या कामिंदू यानं अर्धशतकवीर पसिंदूसोबत ८७ धावांची भागिदारी करत श्रीलंकेचा डाव सावरला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पहिल्या डावात श्रीलंकेच्या ७ बाद २०५ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//